# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** शिरूर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0870 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 01/10/2026 16:41

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023 | 238 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिंनाक पासून):** 30/09/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 30/09/2026
**Time From (वेळेपासून):** 09:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 21:57 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 01/10/2026 **Time (वेळ):** 16:24 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 038
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 01/10/2026 16:24 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 35 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** शिरुर पोस्टे अंकित टाकळी हाजी ,पोलिस चौकी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

Date (दिंनाक ): 01/10/2026 Time (वेळ): 16:24 बजे

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): शैलजा शशिकात शिंदे पोलीस निरीक्षक

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7722011255

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सतिश नाथराव मुंडे<br>- | | | 1. गुजर मळा, माऊली हस्पिटल जवळ,,निर्मल प्लाझा, शिरुर ताशिरुर ,शिरूर,पुणे ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

**S.No.** **UIDB Number**
**(अ.क्र.)** **(यु.आय.डी.बी.क्र.)**

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

शिरुर पोलिस स्टेशन गु र नं 870/2026 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम 7 व भारतीय न्यायसंहिता अधिनियम 2023 कलम 238

फिर्यादि /- श्रीमती शैलजा शशिकात शिंदे, वय- 40 वर्षे, व्यवसाय -नोकरी, पोलीस निरीक्षक, नेमणूक- लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे मो. क्र. 7722011255.

आरोपी /- 1)सतिश नाथराव मुंडे, वय 45 वर्षे, पोलीस हवालदार 1788, नेम- शिरुर पोलीस स्टेशन अंतर्गत टाकळी हाजी पोलीस चौकी, पुणे ग्रामीण रा. श्री. हनमंत लक्ष्मण चव्हाण यांचे घरामध्ये भाडेतत्वावर फ्लॅट नं.5, गणेश रेसिडेन्सी, गुजर मळा, माऊली हॉस्पिटल जवळ, निंमल प्लाझा, शिरुर ता.शिरुर जि. पुणे मुळ गाव -मु. वागदरवाडी, पो.उजणी ता.आंबेजोगाई जि. बीड पिन- 431519

गु घ ता वेळ व ठिकाण - दि.30/09/2026 रोजी सकाळी 09/30 ते 21.57 वा चे दरम्यान शिरुर पोस्टे अंकित टाकळी हाजी चौकीमध्ये

हकिगत /- मी श्रीमती शैलजा शशिकात शिंदे, वय- 40 वर्षे, व्यवसाय -नोकरी, पोलीस निरीक्षक, नेमणूक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मो. क्र. 7722011255.

आज रोजी समक्ष हजर राहून फिंयाद देते की, आम्ही दि. 30/09/2026 रोजी 12/00 वा. आमचे ला.प्र. वि. पुणे कार्यालय येथे हजर असताना श्री सतीश वाळके, पोलीस उप अधीक्षक, प्रशासन, पुणे यांनी आम्हाला त्यांचे कक्षात बोलावून तक्रारदार श्री. देवराम लक्ष्मण गाडीलकर, रा मु.पो. टाकळी हाजी, ता.शिरुर, जि. पुणे यांची तक्रार असून त्यांचे मुलाचा मो.क्र. 9011657085 दिला व ते बोलवतील त्या ठिकाणी जावून सापळा कारवाई करण्याचे आदेश दिले. सदर सापळा कारवाई करण्याकरीता पो.हवा. 3296 गदादे, पो.शि. 1966 तावरे व चालक ऋषीकेश अभंग यांचे ताब्यातील शासकिय वाहन महिंद्रा टि यु व्ही गाडी क्र. एम एच 12 आर वाय 7271 असे मदतीकरीता दिले. तसेच सदर कारवाईकरीता ला.प्र.वि. कार्यालयात राखीव असणारे पंच 1. श्री. ओंकार अरविंद नेवसे, लिपीक टंकलेखक,प्रशिक्षण प्रबोधिनी, पुणे महानगरपालिका, पुणे व पंच क्र. 2 श्री. विपुल विनोद परदेशी, लिपीक टंकलेखक, स्थानिक संस्थाकार, पुणे महानगरपालिका, पुणे हे दोन पंच उपलब्ध करुन दिले. त्यानंतर आम्ही वर नमूद मोबाईल क्रमांकावर संपर्क करुन तक्रारदार यांचे मुलास आम्ही सापळा पथकासह कारवाई करण्यासाठी कोठे येवू अशी विचारणा केली असता त्यांनी आम्हाला रांजणगाव याठिकाणी येण्यासाठी सांगितले. त्यानंतर आम्ही सापळा पथक व पंचासह पडताळणी/सापळा कारवाईसाठी आवश्यक असणारे प्रिंटर, लॅपटॉप, अँथ्रसीन पावडर, काळा कपडा, स्टेशनरी साहित्य, अल्ट्रा व्हायोलेट दिवा, सिलींग लेबलींगचे साहित्य इ. साहित्य शासकीय वाहन महिंद्रा टि यु व्ही गाडी क्र. एम एच 12 आर वाय 7271 मध्ये ठेवुन लाप्रवि कार्यालय, पुणे येथुन 14/00 वा. चे सुमारास रवाना होवून तक्रारदार यांचे मुलाचे सांगणप्रमाणे रांजणगाव येथून सोनसांगवी गावाच्या पुढे टाकळी हाजी रोडने आनंदवन डेव्हलपर्सच्या विरुध्द बाजूस 16/10 वा. चे सुमारास पोहचलो. त्यावेळी तक्रारदार यांचा मुलगा दादाभाऊ हे चारचाकी टाटा नेक्सॉन एम एच 12 डब्लू झेड 3529 यातून सदर ठिकाणी आले. त्यांचे मागे तक्रारदार देवराम गाडीलकर हे हिरो होंडा एम एच 12 एच झेड 3715 या दुचाकीवरुन तेथे आले. त्यानंतर तक्रारदार यांना पंचांसमक्ष त्यांचे पुर्ण नांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. देवराम लक्ष्मण गाडीलकर, रा मु. पो. टाकळी हाजी, ता.शिरुर, जि. पुणे यांचा मो.क्र. 9011657085 असे सांगितले. त्यावेळी मी उपस्थित सर्वांची आपसात ओळख करून दिली व ओळख करून घेतली. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची तक्रार थोडक्यात प्रथम तोंडी कथन केली त्यावेळी मी उपस्थित सर्वांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयाकडून करण्यात येणाऱ्या पडताळणी व सापळा कारवाईबाबतची सविस्तर माहिती दिली. तसेच सदर कारवाईकरीता पंच क्र.1 म्हणून ओकांर नेवसे व पंच क्र.2 म्हणून श्री विपुल परदेशी काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार यांना त्यांचे तक्रारीबाबत विचारणा करता तक्रारदार यांना व्यवस्थित लिहता येत नसल्याने त्यांनी ...

सांगितलेप्रमाणे त्यांचा मुलगा नामे दादाभाऊ गाडीलकर वय 29 वर्षे यांनी त्यांचे स्व:हस्ताक्षरामध्ये दोन पंचासमक्ष लेखी तक्रार लिहून दिली.

"मी अर्जदार श्री. देवराम लक्ष्मण गाडीलकर, वय - 56 वर्षे, धंदा - शेती, रा मु.पो. टाकळी हाजी, ता.शिरुर, जि. पुणे यांचा मो.क्र. 9921495954, माझी पत्नी वय - 50 वर्षे, मुलगा दादाभाऊ -29 वर्षे, लहान मुलगा सागर - 23 वर्षे यांचे जन्मापासून सदर ठिकाणी रहावयास आहे. वडिलोपार्जित गट क्र. 1225 मध्ये आमची 25 एकर शेतजमीन आहे. यामध्ये मी माझा भाऊ व इतर नातेवाईक राहत आहे. सदर जमीनीची 7/12 नुसार वाटणी झाली आहे. तरीही माझे भाऊ विष्णू गाडीलकर व आमच्यामध्ये सदर शेतजमीनीबाबत कौटुंबीक वाद होतात. त्याअनुषंगाने मी दि. 27/02/2026 रोजी व माझ्या पत्नीने दि. 24/08/2026 रोजी शिरुर पोलीस स्टेशन येथे अर्ज दाखल केले होते व माझा भाऊ विष्णू गाडीलकर याने माझे, माझी पत्नी व दोन मुले यांच्या विरुध्द शिरुर पोलीस स्टेशन गु.र.नं. 853/2026 , बीएनएस कलम 126(2), 303(2),324(4), 3(5) अन्वये दि. 26/09/2026 अन्वये तक्रार दिल्याने गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार 1788 सतिश नाथराव मुंडे नेम- शिरुर पोलीस स्टेशन अंतर्गत टाकळी हाजी पोलीस चौकी यांच्याकडे आहे. दि. 28/09/2026 रोजी माझे मो.क्र. 9921495954 यावर सतिश मुंडे यांचा मो.क्र. 9665808794 यावरुन 18/13 वा . फोन करुन मला टाकळी हाजी पोलीस चौकीत बोलवले, त्यामुळे त्यादिवशी रात्री 9/00 वा सुमारास माझा मोठा मुलगा दादाभाऊ पोलीस चौकीस गेला. त्यावेळी त्याला दाखल झालेल्या गुन्हयांमध्ये अटक टाळण्यासाठी काहितरी करावे लागेल असे सतिश नाथराव मुंडे यांनी सांगितले. त्यावेळी मी नसल्याने माझा मुलगा काहीच न बोलता परत आला.

त्यानंतर दि. 29/09/2026 रोजी सकाळी 9/00 वा चे सुमारास माझे मोबाईलवर पोलीस हवालदार मुंडे यांचे दोन वेळा फोन आले व त्यांनी मला पोलीस चौकीस बोलवले. त्यामुळे आज दि. 30/09/2026 रोजी सकाळी 11/00 वा चे सुमारास पोलीस चौकीस जावून पोलीस हवालदार मुंडे यांना भेटलो असता (मी व माझा मोठा मुलगा) यास पोलीस हवालदार मुंडे म्हणाले की, "तुमच्यावर गंभीर गुन्हे दाखल असून तुम्ही मला एक लाख रुपये दिल्यास मी गुन्हावर कोणतीही कारवाई करणार नाही किंवा तुम्हाला अटकही करणार नाही, व फॅमिलीला त्रास देणार नाही," असे म्हणून एक लाख रुपयाची लाच मागणी केली.

त्यामुळे मी व माझ्या मुलाने आम्ही कोणताही गुन्हा केला नसल्याचे व आमच्याकडे पैसे नसल्याचे पो ह मुंडे यांना सांगितले. त्यावर त्यांनी आम्हाला "आजच्या आज एक लाख रुपये आणून द्यावे लागतील, नाहीतर याचे परिणाम गंभीर होतील," असे बोलल्याने आम्ही भितीने त्यांना "हो" म्हणालो. परंतु शिरुर पोलीस ठाणे अंतर्गत टाकळी हाजी पोलीस चौकीतील पोलीस हवालदार सतिश नाथराव मुंडे यांना मागणी केलेली एक लाख रुपये लाच स्वरुपात देण्याची आमची इच्छा नसल्याने माझ्या मुलाने त्याचे मोबाईलद्वारे आज रोजी ला.प्र.वि. कार्यालय पुणे येथे संपर्क करुन कारवाई होणेबाबत तक्रार केली. त्यानंतर सापळा पथक आम्ही सांगितलेल्या ठिकाणी हजर झाले."
त्याचसोबत तसेच पोहवा सतीश मुंडे तपास करत असलेल्या गुन्हयाची छायांकित प्रत आम्हाला दिली. सदर तक्रार वाचुन त्यावर आम्ही व पंचांनी सहया केल्या. त्यानंतर तक्रारदार यांचा मुलगा दादाभाऊ गाडीलकर यांस त्यांचे वैयक्तिक काम असल्याने ते सदर ठिकाणावरुन निघून गेले.
त्यानंतर पडताळणी कारवाईकरीता पडताळणी निवेदने ध्वनिमुद्रीत करण्यासाठी शासकीय व्हॉईस रेकॉर्डरमध्ये खालील नमूद वर्णनाचे नवीन मेमरीकार्ड घातले.
पुढील बाजुस MMC ARDS 32 Micro SD HC 10C 1U I व मागील बाजुस AFCKBA8408 COBO5AOYTM05 Made in Korea असे छापलेले
त्याचप्रमाणे निवेदने ध्वनिमुद्रीत करतेवेळी करण्यात येणा-या व्हिडीओ शुटींगकरीता शाकसीय व्हिडीओ रेकॉर्डरमध्ये खालील नमूद वर्णनाचे नवीन मेमरीकार्ड घातले.
पुढील बाजुस SandDisk 16GB Micro SD HC I 4C व मागील बाजुस MCP 07/24 ZY CE MMC16GB 6TDK -8S YLZ AX215FD 2407 MADE IN TAIWAN असे छापलेले

त्यानंतर निवेदन ध्वनिमुद्रीत करण्याचे ठरवून तक्रारदार व दोन्ही पंचांना व्हॉईस रेकॉर्डर, मेमरी कार्ड याबाबत माहिती देवुन पडताळणी कारवाई बाबत आवश्यक त्या सुचना दिल्या व पंचाचे तसेच तक्रारदार यांचे पडताळणी निवेदन घेतले. त्यानंतर 17/40 वा. चे सुमारास तक्रारदार यांना रेकॉर्डर लावुन पंच क्र. 1 नेवसे यांचेसह तक्रारदार यांचे दुचाकीवरुन लोकसेवक पो हवा सतिश मुंडे यांची भेट घेण्याकरीता शिरुर पोलीस स्टेशन अंतर्गत टाकळी हाजी चौकी, टाकळी हाजी येथे रवाना केले. त्यानंतर 18:51 वाजता तक्रारदार व पंच क्र. 1 नेवसे हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी त्यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन आम्ही आमचे ताब्यात ठेवला. सदरवेळी पंच क्र.1 नेवसे यांना पंच क्र 2 परदेशी यांचेसमक्ष घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली, त्यावेळी पंच क्र.

1 नेवसे यांनी सांगितले की, "आम्ही तक्रारदार यांचे दुचाकीवरुन टाकळी हाजी पोलीस चौकी मध्ये जावुन लोकसेवक मुंडे यांना भेटलो, तेव्हा मुंडे यांनी मला माझे नाव,पत्ता, नाते व कामकाजाविषयी माहिती विचारली, त्यानंतर गाडीलकर यांचेसोबत दाखल गुन्हयाबाबत चर्चा करत त्यांना चौकीबाहेर नेले व मला चौकीतच थांबण्यास सांगितले. मी चौकीमध्येच पो हवा मुंडे व तक्रारदार दिसतील व त्यांचे बोलणे ऐकू येईल अशा स्थितीत बसुन राहिलो.त्यावेळी तक्रारदार यांना पोह मुंडे हे दाखल गुन्हयाबाबत बोलुन रु.1,00,000/-ची (एक लाख रुपये) पैशाची मागणी करत असल्याचे मला ऐकु आले.
त्यानंतर आम्ही तक्रारदार देवराम गाडीलकर याना विचारले असता त्यांनी सांगितले की, मी रेकॉर्डर लावुन पंच 1 नेवसे यांचेसोबत माझे दुचाकीवरुन चौकीमध्ये गेलो, त्यावेळी चौकीच्या आतमध्ये माझ्याशी चर्चा करुन पंच क्र. 1 यांना चौकीतच थांबण्यास सांगून मला चौकीच्या बाहेर घेवून आले व बोलताबोलता माझ्या अंगावरुन हात फिरवून खात्री केली तसेच माझ्या डोळ्याचा चश्मा काढण्यास सांगितला. त्यावेळी पंच क्र.1 हे जवळच उभे राहून आमचे बोलणे ऐकत होते. त्यानंतर लोकसेवक मुंडे यांनी माझ्या विरोधात दाखल असलेल्या गुन्हाबाबत चर्चा करुन तुम्हाला काल सांगितल्याप्रमाणे द्यावे लागतील, मी साहेबांना तसे सांगितले आहे तुम्ही बोललात म्हणून मी साहेबांना बोलून बसलो, आता कमी नाइ होणार, मला माझ्या पदरचे घालावे लागतील असे बोलून "आज नाय झाल ना चहा बी पेत नाय तुमचा उदया..एकदा त्या दिवसा पुरतच का हाय ती करत असतो परत बोलत बी नाही" असे बोलून लाच रक्कम आजच्या आज दया असे बोलू लागले. त्यानंतर मी त्यांना आता "आज पन्नास देतो उदया राहिलेलं पन्नास देतो ना" अशी विंनती केली असता त्यांनी संपुर्ण रुपये एक लाख दयावे लागतील असे बोलून "लागल तर दहा हजार कमी राहू दया मी घातलो माहिती का तिकडे"असे मला सांगितले. त्यावर आमचेत आणखी चर्चा होवून मी त्यांना रुपये पन्नास हजारच अॅडजस्ट झाल्याचे सांगितले असता त्यांनी "मग माझ्या खिशातले कसे काय देणार तु..अं दिले बी असते मी हजार-दोन हजार जावू दया म्हणल पन्नास -पन्नास हजार कुठुन देणार मी पाटकुनी बगा अन मला सांगा" असे मला लोकसेवक मुंडे यांनी सांगितले. त्यावर मी त्यांना "तुम्हीच सांगा फायनल किती आकडा" असे विचारले असता त्यांनी "मी म्हणल ना पाच एक हजार कमी दया मला मी म्हणतो म्हणजे मला जी साहेब देणार होते का त्याच्यातले मी कमी करतो म्हणजेच माझच नुकसान म्हणायंच पाच हजार" असे मला बोलले असता मी त्यांना "पंच्यानव हजार" असे विचारले असता त्यांनी "हा" असे सांगितले. त्यावर खात्री करण्यासाठी मी पुन्हा त्यांना "पंच्यानव हजार दयायचे तुम्हाला ना..पण माझ्या कुटंूबाला परत काय त्रास नको व्हायला" असे बोललो असता लोकसेवक मुंडे यांनी "कधीच नाय होणार" असे बोलून माझ्यासोबत आणखी चर्चा करून मागणी केलेली लाचेची रक्कम सायंकाळी सात वाजता पर्यंत घेवून येण्यास सांगितले. एकंदरीत झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक मुंडे यांनी तपास अधिकारी म्हणून तक्रारदार यांचे विरुध्द शिरुर पोस्टे येथे दाखल गुन्हयामध्ये तक्रारदार व त्यांचे कुटंूबियांना मदत करण्यासाठी प्रथम रु.1,00,000/-व तडजोडी अंती रु.95,000/- इतक्या लाच रक्कमेची मागणी तक्रारदार यांचेकडे साहेबांचे नाव सांगुन त्यांचे स्वत:करीता करून सदर रक्कम सायंकाळी सात वाजता टाकळी हाजी पोलीस चौकी येथे घेवून येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. तसेच सदर संभाषण हे शासकीय रेकॉर्डरमध्ये फास्ट फॉरवर्ड करुन ऐकले असता लोकसेवक सतीश मुंडे यांनी तक्रारअर्जदार यांना सुरुवातीस 100000/- रुपये व तडजोडी अंती 95,000/- रुपये मागितल्याचे निष्पण्ण झाले आहे.
त्यानंतर सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्याकरता तक्रारदार देवराम गाडीलकर व दोन्ही पंचांचे सापळा कारवाईकरीताची निवेदने 20.03 वाजता ध्वनिमुद्रीत केली. त्या दरम्यान तक्रारदार यांना त्यांचा मोबा.क्र.9921495954 वर लोकसेवक मुंडे यांनी त्यांचा मोबा.क्र.9373204261वरुन कॉल केल्याने निवेदन संपल्यानंतर तक्रारदार यांनी लोकसेवक मुंडे यांना 20.20 वाजता कॉल केला असता लोकसेवक यांनी तक्रारदार यांना त्यांचे ट्रॅक्टरबाबतची माहिती विचारली व संध्याकाळी टाकळी हाजी चौकीलाच असल्याचे सांगितले..त्यानंतर मी उपस्थित सर्वांना पडताळणी कारवाईचे अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या. सदर कॉल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत करण्यात आलेला आहे. तक्रारदार यांनी आमचेसमक्ष 95,000/- रुपये रकमेपैकी 50,000/- रुपये (रु.500/- दराच्या एकुण 100 भारतीय चलनी नोटा) हजर केले. त्यानंतर उर्वरित रु. 45,000/- रुपये रकमेकरीता ला.प्र.वि. पुणे कार्यालयाकडील रु.500/- असे छापलेल्या खेळण्यातील एकुण 90 नोटा समाविष्ट केल्या. त्यांना एकत्रित करुन त्याचे दोन बंडल बनवले, त्यानंतर दोन्ही पंचांना व तक्रारदार यांना शासकीय वाहन चालक अभंग यांनी अँथ्रासीन पाउडरचे प्रात्यक्षिक दाखवून त्याचे गुणधर्म समजावून सांगितले व सदर नोटांचे दोन्ही बंडलला अँथ्रासीन पाउडर लावली. त्यानंतर शासकीय वाहन चालक अभंग यांनी नोटांचे बंडल तक्रारदार यांचे पँटच्या उजव्या खिशात ठेवले व तक्रारदार यांना लोकसेवक मुंडे यांनी सापळयाच्या अनुषंगाने आवश्यक सुचना देवुन लाच रक्कम स्विकारल्यास डोक्यावरील गांधी टोपी काढून हातात घेण्याबाबतचा इशारा करण्याची सुचना दिली. त्यानंतर 20/44 वा. चे सुमारास तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्डर लावुन तक्रारदार यांना पंच क्र. 1 यांचेसह टाकळी

हाजी चौकी येथे त्यांचे दुचाकीवरुन रवाना केले. त्यानंतर तक्रारदार यांचे मागोमाग आम्ही सापळा पथक व पंच क्र 2 यांचेसह आमचे शासकीय वाहनातुन रवाना झालो. त्यानंतर पुर्वनियोजित इशा-यानुसार तक्रारदार यांनी दुचाकीचे इंडीकेटर लावुन चौकी जवळ आल्याचा इशारा करुन गाडी पार्क करुन तक्रारदार हे पंच नेवासे यांचेसह चौकीमध्ये गेले, त्यावेळी आम्ही आमचे शासकीय वाहन चौकीपासून लांब 200 मीटर अंतरावर लावुन सापळा पथक व पंच क्र. 2 असे पायी परत येवून टाकळी हाजी चौकीसमोरील सुमारे 70 मीटर अंतरावर असलेल्या रस्त्यावर विखरुन थांबलो. त्यावेळी चौकीच्या बाहेरील ओटयावर तक्रारदार, पंच क्र.1 व वर्दीमध्ये असलेले एक इसम हे खुर्चीमध्ये बसून बोलत असल्याचे दिसले. त्यानंतर थोडया वेळात ओटयावरील खुर्चीवर बसलेल्या वर्दीतील इसम हा तक्रारदार गाडीलकर यांना घेवुन चौकीमध्ये गेला व त्यावेळी पंच क्र.1 नेवसे हे सदर चौकीचे बाहेर थांबल्याचे मला दिसले. पुढील थोडयाच वेळात तक्रारदार यांनी चौकीच्या बाहेर येवुन डोक्यावरील टोपी काढून पुर्वनियोजित इशारा केल्याचे मी पाहिले. त्यानंतर तक्रारदार यांनी टोपी काढलेली दिसताच मी व सापळा पथक चौकीच्या दिशेने जात असताना तक्रारदार यांचेसोबत चौकीमध्ये गेलेला वर्दीतील इसम त्यांचे हातामध्ये कागदपत्रे असलेले प्लास्टीक फोल्डर व पांढ-या रंगाचे कागदामध्ये काहीतरी चिजवस्तुसह बाहेर घेवुन येताना व त्याच वेळी दुसरा वर्दीधारी इसम आत चौकीमध्ये जाताना मी पाहिले.

त्यानंतर लागलीच त्यावेळी मी सापळा पथकासह चौकीमध्ये जात असताना तक्रारदार व पंच क्र.1 असे चौकीपासून सदर ठिकाणावरून थोडे अंतरावर जावून थांबले. त्यावेळी आम्ही चौकीमध्ये हजर असलेले होमगार्ड विभागीय नाईक 3207 मनोहर जयसिंग पुंडे व चौकी बाहेर असलेले पोलीस शिपाई क्र 1541/रघुनाथ भिमराव हाळनोर यांना लोकसेवक मुंडे यांचेबाबत विचारणा केली असता त्यांनी चौकीच्यामागील बाजुस असणा-या शौचालय येथे गेले असल्याचे सांगितल्याने आम्ही चौकीच्या मागील बाजूस असलेल्या शौचालय व इतर ठिकाणी पाहिले असता लोकसेवक मुंडे मिळून आले नाहीत. त्यांची शोध घेत असताना तक्रारदार व पंच क्र.1 असे चौकीमध्ये आले असता पोशि तावरे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केला. ती वेळ 21.57 वाजताची होती. सदरवेळी तक्रारदार व पंच क्र. 1 नेवसे यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, पंच क्र. 1 यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे टाकळी हाजी चौकी येथे पोहचल्यानंतर लोकसेवक मुंडे हे चौकीचे बाहेर ओटयावर खुर्चीवर बसून होते. आम्ही दोघे त्यांचेजवळ जावून दोन खुच्र्या घेवून बसलो. त्यावेळी तक्रारदार गाडीलकर व लोकसेवक मुंडे यांचेत त्यांचे कामाबाबत बराच वेळ चर्चा झाली. त्यानंतर लोकसेवक मुंडे हे तक्रारदार यांना चौकीच्या आतमध्ये घेवून जात असताना मला लोकसेवक मुंडे यांनी बाहेरील मोकळया मैदानात थांबण्यास सांगितले. त्यावेळी चौकीच्या आतमध्ये गेलेले ते दोघे मला दिसतील अशा स्थितीत मी थांबून राहिलो. त्यावेळी मी पाहिले की, तक्रारदार व लोकसेवक मुंडे हे चौकीतील एका टेबलाजवळ उभे असून लोकसेवक मुंडे यांनी तक्रारदार यांचेसमोरील टेबलवर एक पांढ-या रंगाचा कागद ठेवला असता तक्रारदार यांनी त्यांचे पॅन्टीच्या उजव्या खिशातुन त्यांचे उजव्या हाताने ठेवलेली लाचेची रक्कम काढून ती लोकसेवक मुंडे यांनी टेबलावर ठेवलेल्या पांढ-या कागदावर ठेवली असता त्यावर लोकसेवक मुंडे यांनी दुसरा पांढरा कागद ठेवून सदर रक्कम त्यामध्ये मुडपुन हातात घेतल्याचे मी पाहिले. त्यानंतर लागलीच तक्रारदार सदर खोलीतुन बाहेर आले व त्यांनी त्यांचे डोक्यावर परिधान केलेली पांढ-या रंगाची गाधी टोपी डाव्या हाताने काढून लाच रक्कम स्वीकारलेबाबत पुर्वनियोजित इशारा करुन माझ्याकडे येत असताना त्यांचे मागोमाग लगेच लोकसेवक मुंडे हे तक्रारदार यांचे गुन्हयाची कागदपत्रे असलेला प्लास्टीक फोल्डर व तक्रारदार यांचेकडून स्वीकारून पांढ-या कागदामध्ये ठेवलेली लाचेची रक्कम घेवून बाहेर आले. त्याचवेळी वर्दी घातलेला दुसरा इसम चौकीमध्ये गेला. त्याचवेळी चौकीचे ओटयाचे समोर दुचाकीवर एक साधा वेशामध्ये इसम मोबाईलमध्ये पाहत बसलेला होता. मी तक्रारदार यांचेकडे गेल्यानंतर आम्ही सदर चौकीपासून काही अंतरावर बाजुला जात असताना सापळा अधिकारी व पथक हे रस्त्यावरून चौकीकडे येत होते त्यावेळी लोकसेवक मुंडे हे चौकीचे पाठीमागील बाजूला पळून गेल्याचे मी पाहिले. त्यानंतर मी व तक्रारदार असे पुन्हा चौकीमध्ये आलो. त्यावेळी मी व तक्रारदार असे आम्ही आपणास लोकसेवक मुंडे यांचे पळुन जाण्याबाबतची माहिती दिली असता आपण पुढील झडती व जप्तीची कारवाई केली." अशी हकिकत पंच क्र.1 यांनी सांगितली.

त्यानंतर तक्रारदार यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, "मी व पंच क्र. 1 असे टाकळी हाजी चौकी येथे पोहचल्यानंतर लोकसेवक मुंडे हे चौकीसमोरील ओटयावर खुर्चीवर बसलेले होते. तेथे मुंडे यांनी मला व पंचांना बसण्यास खुर्ची दिली. त्यावेळी माझ्याविरुध्द दाखल गुन्हयाबाबत चर्चा सुरु असताना लोकसेवक मुंडे यांच्या हातामध्ये माझ्याविरुध्द दाखल गुन्हयांची मुळ कागदपत्रे असलेला प्लास्टीक फोल्डर होता. सदर फोल्डरमधून त्यांनी पंचासमक्ष सर्व कागदपत्रे बाहेर काढले. ती पाहून लोकसेवक मुंडे हे मला गुन्हयातील गैरअर्जदार, माझे ट्रॅक्टर, शेती व घर इत्यादी बाबतची माहिती विचारत होते त्या त्याप्रमाणे मी त्यांना माहिती सांगत होतो. त्यानंतर आमचेत माझ्या विरुध्द दाखल गुन्हयाचे अनुषंगाने आणखी चर्चा सुरू असताना लोकसेवक मुंडे यांनी पंच क्र.1 नेवसे यांना

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

थोडे दुर थांबण्यास सांगुन मला ते चौकीचे ओटयाला लागुन असलेल्या खोलीमध्ये टेबलजवळ घेवून गेले त्यावेळी पंच क्र.1 हे आम्ही दिसु अशा बेताने थांबल्याचे मी पाहिले.
त्यावेळी लोकसेवक मुंडे यांनी मला "तुम्ही केलय काम ते" असे बोलून माझ्याकडे लाच रकमेबाबत विचारणा केली असता मी "काम केलय ना..थोड होत असल साहेबांकडून तर थोड सहकार्य" असे बोलून साहेबांबरोबर फोनद्वारे बोलणे करून देण्याची विंनती केली असता लोकसेवक मुंडे यांनी त्यास टाळाटाळ केली. त्यानंतर थोडी चर्चा करून मी त्यांना "देवू का तुम्हाला...देवू का लगी" असे लाच रकमेबाबत विचारले असता लोकसेवक मुंडे यांनी जवळच्या टेबलावर एक पांढ-या रंगाचा ए फोर साईज कागद ठेवून मला "हयाच्यावर ठेवा" असे बोलून त्यावर लाच रक्कम ठेवण्यास सांगितले असता मी माझ्या पॅन्टचे उजव्या खिशामध्ये ठेवलेली लाचेची रक्कम उजव्या हाताने काढून सदर कागदावर ठेवली. त्यावेळी लोकसेवक मुंडे यांनी लाच रकमेवर आणखी एक पांढ-या रंगाचा ए फोर साईज कागद वरून ठेवला व लाच रक्कम त्या दोन्ही कागदामध्ये खालुन वरून मुडपुन हातात घेतली असता मी त्यांना "मोजुन घ्या साहे पंच्यानव हजार मोजुन घ्या" असे सांगितले असता त्यांनी "आसुदया आसुदया" असे बोलले व त्यानंतर "जावा" असे बोलून मला सदर खोलीच्या बाहेर जाण्यास सांगितले. त्यावेळी मी बाहेर येत असता सदर खोलीमध्ये होमगार्ड पं◌ुडे हे आतमध्ये गेले. त्यावेळी मी माझ्या डोक्यावरील टोपी डाव्या हाताने काढून लाच रक्कम स्वीकारलेबाबत पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर मी पंच क्र.1 यांचेजवळ गेलो त्यावेळी लोकसेवक मुंडे हे त्यांचे हातातील कागदपत्रे व लाच रक्कम घेवून चौकीतुन बाहेर आले व सापळा पथक पोहचण्यापुर्वी चौकीचे पाठीमागील बाजूस लाच रक्कम व माझ्या विरुध्द दाखल गुन्हयाची कागदपत्रे ठेवलेला प्लास्टीक फोल्डर हातात घेवून पळून गेले. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे पुन्हा चौकीमध्ये येवून लोकसेवक मुंडे यांचे पळून जाण्याबाबत आपणास माहिती दिली. त्यानंतर आपण पुढील झडती व जप्तीची कारवाई केली." अशी हकिकत तक्रारदार यांनी मला सांगितल्यानतर मी सापळा कारवाई दरम्यान व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये ध्वनिमुद्रीत झालेल्या फाईलमधील ध्वनिमुद्रीत संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकून तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकत बरोबर असल्याची खात्री केली. सदरबाबत दि.30/09/2026 रोजीचा सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा करण्यात आलेला आहे. तसेच आलोसे पळून गेल्यानंतर दोन्ही पंचासमक्ष घेण्यात आलेल्या झडती दरम्यान आलोसे यांचा एचपी कंपनीचा लॅपटॉप, हुंदाई कंपनीचे चारचाकी वाहन क्र.एमएच 33 एसी 7290 व त्याची चावी तसेच सॅमसंग व व्हीवो कंपनीचे दोन मोबाईल तसेच गुन्हयात ध्वनिमुद्रण व व्हिडीओ चित्रिकरणाकरीता वापरण्यात आलेली दोन मेमरीकार्ड असा मुद्देमाल पुढील तपास व पुरावेकामी जप्त करण्यात आलेली आहेत. सदरबाबत सविस्तर पंचनाम्यामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.
तरी दिंनाक 30/09/2026 रोजी तक्रारदार श्री. देवराम लक्ष्मण गाडीलकर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. 30/09/2026 रोजी 9:30 वा ते 21.57 वाचे दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कारवाई लोकसेवक   यांनी तक्रारदार यांचे विरुध्द शिरुर पोस्टे येथे दाखल गुन्हयामध्ये तपास अधिकारी म्हणून त्यांना मदत करण्यासाठी लोकसेवक मुंडे यांनी त्यांचे साहेबांचे नाव सांगुन त्यांचे स्वत:करीता प्रथम रु. 1,00,000/- व तडजोडी अंती रु. 95,000/- लाचेची मागणी करून ती टाकळीहाजी चौकीमध्ये पंचांसमक्ष स्वीकारून तक्रारदार यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम कलम 7 व भारतीय न्यायसंहिता अधिनियम 2023 कलम 238 दाखल गुन्हयाची मुळ कागदपत्रे व स्वीकारलेल्या लाच रकमेसह पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने घटनास्थळावरून पळून गेले म्हणुन माझी लोकसेवक पोलीस हवालदार 1788 सतिश नाथराव मुंडे नेम- शिरुर पोलीस स्टेशन अंतर्गत टाकळी हाजी पोलीस चौकी यांचेविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम कलम 7 व भारतीय न्यायसंहिता अधिनियम 2023 कलम 238 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.
दाखल अंमलदार--पो हवा खबाले 2342
तपासी अंमलदार—पोनि सुहास हट्टेकर, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. पुणे

**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)

**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
Vinod Bhagwan Patil(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)

**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस ठाणे अंमलदार

शिरूर पोलीस स्टेशन पुणे ग्रा.

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Vinod Bhagwan Pati

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):